# <u>प्रसिध्दी पत्रक</u>

**श्रीमती दिपाली तुकाराम जाधव, वय ३० वर्षे, व्यवसाय नौकरी तलाठी, तलाठी सजा रहिमाबाद, ता. सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद या १५००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्रीमती दिपाली तुकाराम जाधव, वय ३० वर्षे, व्यवसाय नौकरी तलाठी, नेमणुक तलाठी सजा रहिमाबाद, ता. सिल्लोड, जिल्हा- औरंगाबाद.<br>रा. प्लॉट नंबर ५६, फ्लॅट नंबर २, सर्वे नंबर १८८, यशराज अपार्टमेंट, म्हसोबा मंदीराजवळ, हर्सुल, औरंगाबाद. |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक १०/१२/२०१८ रोजी टिळकनगर सिल्लोड येथील आलोसे यांचे खाजगी कार्यालय. |
| लाचेची रक्कम | :- | १५००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी पत्नीच्या नावे खरेदी केलेल्या जमीनीची फेरफारची नोंद फेरफार रजीस्टरला करण्यासाठी |

यातील तक्रारदार यांनी त्यांचे पत्नीचे नावावर रहिमाबाद ता. सिल्लोड शिवारात जमीन खरेदी केलेली आहे. सदर जमीन खरेदी केल्यानंतर तिचा फेर करण्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रांसह तलाठी कार्यालय, सिल्लोड येथे श्रीमती जाधव यांच्याकडे दिले होते. त्यानंतर ७-८ दिवसानंतर फेरफार नोंद फेरफार रजीस्टरला घेण्यासाठी तक्रारदार हे श्रीमती जाधव यांना भेटले असता, श्रीमती जाधव यांना २०००/- रु. मागणी केली. परंतू तक्रारदार यांची त्यांचे पत्नीच्या नावावर असलेल्या जमीनीचा फेरफार नोंद घेण्यासाठी श्रीमती जाधव यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १०/१२/२०१८ रोजी श्रीमती दिपाली तुकाराम जाधव, तलाठी यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांना पाठवून लाचेची मागणी बाबत पडताळणी केली असता, श्रीमती जाधव यांनी तक्रारदार यांच्या पत्नीच्या नावावर असलेल्या जमीनीची फेरफार नोंद फेरफार रजीस्टरला करण्यासाठी १५००/- रु लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.१०/१२/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला असता, श्रीमती दिपाली तुकाराम जाधव, वय ३० वर्षे, व्यवसाय नौकरी तलाठी, नेमणुक तलाठी सजा रहिमाबाद, ता. सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांनी पंच साक्षीदारा समक्ष १५००/- रुपये लाचेची रक्कम टिळकनगर सिल्लोड येथील आलोसे यांचे खाजगी कार्यालयात तक्रारदार यांचेकडून स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४
Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, अँटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

(गणेश धोक्रट)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद